1) महौदार्य शब्दातील योग्य संधी विग्रह ओळखा ?

A) मह + औदार्य B) मह् + औदार्य C) महा + औदार्य D) महौ + ओदार्य

2) मला मनाची शांती हवी. या वाक्यामध्ये अधोरेखीत केलेल्या शब्दाची जात ओळखा ?

A) विशेष नाम B) भाववाचक नाम C) सामान्य नाम D) विशेष नाम

3) 'पिसू' ह्या शब्दाचे अनेकवचनी रुप पुढीलपैकी कोणते ?

A) पिसवे B) पिसवा C) पिसू D) पिसव्या

4) 'गायरान' या सामासिक शब्दाचे लिंग पुढीलपैकी कोणते ?

A) पुल्लिंग B) स्त्रिलिंग C) नपुसकलिंग D) यापैकी नाही

5) जे चकाकते, ते सोने नसते. या वाक्यातील 'जे' हे काय आहे ?

A) संबंधी सर्वनाम B) दर्शक सर्वनाम C) प्रथम पुरुषवाचक सर्वनाम D) प्रश्नार्थक सर्वनाम

6) सचिनने काल पन्नास धावा काढल्या. या वाक्यात पन्नास हे काय आहे ?

A) गुणवाचक विशेषण B) संख्यावाचक विशेषण C) सार्वनामिक विशेषण D) सांगता येत नाही

7) पुढीलपैकी कोणते वाक्य हे सकर्मक क्रियापदाचे आहे ?

A) श्रावणीला थंडी वाजते B) सीतेने हनुमानास ओळखले
C) कानात वारे शिरले D) मला पपई आवडते

8) खालीलपैकी शुध्द शब्द ओळखा ?

A) तिर्थस्थान B) तीक्ष्ण C) तीखट D) तात्काळ

9) 'भित्रा माणूस' यासाठी खालीलपैकी कोणता अलंकारीक शब्द वापराल ?

A) बोंबल्या विंचू B) चंदू लाल C) शेंदाड शिपाई D) सुदाम्याचा अवतार

10) जीवाचे रान करणे यासाठी समानार्थी वाक्प्रचार सांगा ?

A) हाडाची काडे करणे B) हाड मोडणे C) जीवाची लाहीलाही होणे D) यापैकी नाही

11) त्याला चित्र काढता येत नाही. या वाक्याचा प्रकार ओळखा ?

A) करणरुपी B) अकरणरुपी C) विधानार्थी D) प्रश्नार्थी

12) तो संगणकावर काम करीत असतो या वाक्याचा काळ ओळखा ?

A) साधा वर्तमान काळ B) साधा भविष्य काळ C) पुर्ण भुतकाळ D) रीति वर्तमानकाळ



Scanned with OKEN Scanner

13) पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्द हे क्रियाविशेषण अव्यय या जातीचे आहेत ?

A) शांती, क्षमा B) जलद, हळू C) चालतो, पळतो D) सुंदर, शुभ्र

14) 'खबरदार जर टाच मारुनि, जाल पुढे चिंधड्या उडवीन राई-राई एवढया' या वाक्यातील क्रियापदाचा अर्थ ओळखा ?

A) विध्यर्थ B) स्वार्थ C) संकेतार्थ D) आज्ञार्थ

15) 'अटकेपार झेंडा लावणे' या वाक्यप्रचाराचा खालीलपैकी अर्थ कोणता ?

A) पराक्रम करणे B) वेशीवर झेंडा लावणे C) संकट ओढावणे D) सरशी करणे

16) खालीलपैकी किती शब्द अशुध्द आहेत ते मोजा ?

घोषीत, चतुर, चिरंजिव, चुकभुल, छापील, जडजवाहर, घनिष्ठ

A) 5 B) 4 C) 3 D) 2

17) साहित्य-परीषद उद्या होणार आहे. अधोरेखित शब्दात कोणते विरामचिन्ह वापरण्यात आले आहे ?

A) अपसारणचिन्ह B) संयोगचिन्ह C) काकपद D) लोपचिन्ह

18) पक्षी झाडावर बसला होता. या वाक्यातील अधोरेखीत शब्दाची जात ओळखा ?

A) उभयान्वयी अव्यय B) शब्दयोगी अव्यय C) क्रियाविशेषण अव्यय D) केवलप्रयोगी अव्यय

19) 'अकरावा रुद्र' या अलंकारीक शब्दाचा खालीलपैकी कोणता अर्थ होतो ?

A) कारस्थान करणारा B) अतिशय तापट माणूस C) म्हातारा माणूस D) लबाड माणूस

20) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?

A) कांचन B) हेम C) कनक D) रौप्य

21) खालील दिलेल्या शब्दांपैकी जोडाक्षर असलेला शब्द कोणता ?

A) अंडज B) गृह C) पार्थ D) कृपा

22) कन्या ह्या शब्दाचा खालीलपैकी कोणता समानार्थी शब्द नाही ?

A) लेक B) तनुजा C) तनया D) हेमा

23) भाववाचक नाम असलेला शब्द ओळखा ?

A) सुंदर B) शत्रुत्व C) गरीब D) देव

24) खालीलपैकी कोणता शब्द फारसी भाषेतून आलेला आहे ?

A) पगार B) नोकर C) तिजोरी D) चावी

Scanned with OKEN Scanner

25)

| पा | भं | ही | ग | ना | दु | ने | मा | ठी | र | का | ल्या | णी | त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

वरील सर्व अक्षरांची योग्य जुळवणी करुन योग्य म्हण तयार होते, त्या म्हणीचे शेवटून तिसरे अक्षर कोणते?

A) ही B) त C) ने D) दु

26) नदी, झरा, ओढा, नाला, समुद्र या शब्दांचा योग्य क्रम लावल्यास मधोमध कोणता शब्द येईल ?

A) नाला B) नदी C) झरा D) ओढा

27) सत्यवान हा महेशचा मामा आहे. पण महेशच्या वडिलांना भाऊ-बहिण नाही. तर सत्यवान हा महेशच्या वडिलांचा कोण ?

A) जावई B) मेहुणा C) भाचा D) भाऊ

28) अतुल अग्नेयेला दक्षिण म्हणतो, ईशान्येला पूर्व म्हणतो, पूर्वेला अग्नेय म्हणतो, वायव्येला उत्तर म्हणतो, दक्षिणेला नैऋत्य म्हणतो व पश्चिमेला वायव्य म्हणतो. तर सायंकाळी 4.30 वाजता अतुलची सावली कोणत्या दिशेला पडेल ?

A) वायव्य B) ईशान्य C) अग्नेय D) दक्षिण

29) पांढरा, लाल, गुलाबी, पिवळा या रंगाच्या पताका उलटया क्रमाने लावल्यास 69 व्या क्रमांकाची पताका कोणत्या रंगाची असेल ?

A) पिवळा B) पांढरा C) लाल D) गुलाबी

30) एका टेबलावर चौकोनी व त्रिकोणी असे 30 पुट्ठे आहेत. त्यांच्या कोनांची संख्या 103 आहे. तर त्यापैकी त्रिकोणी पुट्ठे किती ?

A) 13 B) 14 C) 16 D) 17

31) 2 + 4 + 6 + ...................... + 70 = ?

A) 1255 B) 1258 C) 1260 D) 1270

32) एका आयताकृती मैदानाच्या कडेने व कोपऱ्यावर प्रत्येकी 4 मीटर अंतरावर 1 याप्रमाणे मुले उभी केली, जर मैदानाच्या लांबीवर 12 मुले व रुंदीवर 8 मुले उभी असल्यास त्या मैदानावर एकुण किती मुले उभी होती?

A) 34 B) 36 C) 38 D) 40


33) P_QPPQ_PPQ_PPQ_P या अक्षरमालेत कोणता अक्षर गट क्रमशः पुन्हा पुन्हा आला आहे ?

A) PQPP B) QQPP C) PQQP D) PPQQ



Scanned with OKEN Scanner

खालील आकृतीवरुन प्रश्न क्रमांक 34 ते 36 ची उत्तरे लिहा.




34) 卐 च्या जागी कोणते अक्षर येईल ?


A) M B) N C) P D) Q




35) Δ च्या जागी कोणते अक्षर येईल ?

A) T B) V C) U D) W

36) □ च्या जागी कोणते अक्षर येईल ?

A) P B) N C) O D) S

37)  ?

A)  B)  C)  D) 

38) $\sqrt{\frac{45}{80}} = ?$

A) $\frac{9}{16}$ B) $\frac{4}{3}$ C) $\frac{3}{4}$ D) $\frac{5}{8}$

39) जेष्ठ : पौष ? : कार्तिक

A) मार्गशीर्ष B) श्रावण C) माघ D) अश्विन

40) TRANSFER, RTRANSF, FRTRAN, NFRTR, .................. ?

A) RNFRT B) FRTNR C) RFRT D) RNFR

41) एका सांकेतिक भाषेत NICE BOOK हा शब्द 12345667 असा लिहिला. दुसऱ्या सांकेतिक भाषेत MOBILE ERA हा शब्द 012345567 असा लिहितात. तर पहिल्या भाषेतील CBI हा शब्द दुसऱ्या भाषेत कसा लिहिला जाईल ?

A) EIB B) IEB C) BEI D) EBI



Scanned with OKEN Scanner

42) 53 : 517 :: 68 : ?

A) 1001 B) 729 C) 730 D) 734

43) 2735630 : 9437102 :: 2149370 : ?

A) 8321501 B) 2854610 C) 880890 D) 2845712

44) खालील विधाने व अनुमाने यांच्यासाठी खालीलपैकी अचुक पर्याय शोधा.

विधाने : काही खांब दिवे आहेत.
कोणताही दिवा ट्रक नाही.

अनुमान : 1) कोणताही खांब ट्रक नाही. 2) कोणताही दिवा खांब नाही.
3) काही खांब ट्रक आहेत. 4) काही दिवे खांब आहेत.

A) फक्त 1 बरोबर B) फक्त 1 व 3 बरोबर C) 1, 2 व 4 बरोबर D) फक्त 4 बरोबर

45) 3 मार्च 2004 हा दिवस जर सोमवार असेल तर 11 मार्च 2011 या दिवशी कोणता वार असेल ?

A) मंगळवार B) बुधवार C) गुरुवार D) शुक्रवार

46) राघव महेंद्रपेक्षा 14 दिवसांनी लहान आहे. महेंद्रचा जन्म 23 नोव्हेंबर 1980 या दिवशीचा आहे. महेंद्रचा दुसरा वाढदिवस गुरुवारी येत असल्यास राघवचा 6 वा वाढदिवस कोणत्या दिवशी येईल ?

A) रविवार B) सोमवार C) मंगळवार D) बुधवार

47) गणेश खाली डोके व वर पाय करुन उभा आहे. अशा अवस्थेत त्याचा डावा पाय पुर्वेस असेल, तर त्याचे तोंड कोणत्या दिशेस असेल ?

A) पुर्व B) पश्चिम C) दक्षिण D) उत्तर

48) हिवाळी दिवस उन्हाळी दिवसांपेक्षा जास्त ढगाळ असतात. पावसाळी दिवस हिवाळी दिवसांपेक्षा जास्त ढगाळ असतात. जर ही दोन्ही विधाने सत्य असतील तर " उन्हाळी दिवस हे पावसाळी दिवसांपेक्षा कमी ढगाळ असतात " हे विधान ................ आहे.

A) नेहमीच सत्य B) नेहमीच असत्य C) सत्य किंवा असत्य असेल D) निश्चित सांगता येत नाही

प्रश्न क्रमांक 49 ते 50- एक दुकानदार आपल्या दुकानातील वस्तुंच्या किंमती सांकेतिक स्वरुपात व्यक्त करण्यासाठी MAKE STRONG या अक्षरांचा वापर करतो. यानुसार M = 0, A = 1, K = 2, E = 3 व याप्रमाणे पुढे क्रमांक आहेत. यावरुन खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

49) GSA.MT असे लेबल असणाऱ्या वस्तुची किंमत किती असेल ?

A) 914.50 B) 941.05 C) 941.50 D) 1041.50

50) 935.45 इतकी किंमत असणाऱ्या वस्तुचे लेबल कसे असेल ?

A) GKT.SA B) GST.SA C) GET.SK D) GTE.SK

51) दोन संख्यांचा म.सा.वि. आणि ल.सा.वि. अनुक्रमे 21 व 252 आहे. जर त्यापैकी एक संख्या 84 असेल तर दुसरी संख्या कोणती असेल ?

A) 65 B) 104 C) 63 D) 112

52) $\frac{3}{5}$, $\frac{4}{15}$ आणि $\frac{7}{10}$ या अपुर्णांकांचा ल.सा.वि. किती ?

A) $\frac{84}{5}$ B) $\frac{5}{84}$ C) $\frac{168}{5}$ D) $\frac{12}{5}$

53) 16+20÷5X3-17 = ?

A) 4.6 B) 11 C) 5 D) 15

54) 10 □ 15 □ 2 □ 4 □ 36 रिकाम्या चौकटीमध्ये चिन्हे भरा.

A) + X − = B) = + X − C) X − + = D) = X − +

55) एका शेतामध्ये एकूण झाडांपैकी $\frac{2}{5}$ झाडे आंब्याची आहेत, $\frac{3}{7}$ झाडे पेरुची आहेत व उर्वरीत झाडे संत्र्याची आहेत जर शेतात एकूण 175 झाडे असतील तर संत्र्याची झाडे किती ?

A) 21 B) 25 C) 30 D) 35

56) 35 रुपयाला दिड डझन केळी मिळते व 38 रुपयाला अडीच किलो साखर मिळते, तर 6 डझन केळी व 10 किलो साखर यांची एकुण किंमत किती ?

A) 275 रुपये B) 288 रुपये C) 310 रुपये D) 292 रुपये

57) दोन क्रमवार विषम संख्यांची बेरीज 96 आहे, तर त्यापैकी मोठी संख्या कोणती ?

A) 45 B) 47 C) 49 D) 51

58) 187 चा $\frac{3}{11}$ हा कोणत्या संख्येचा $\frac{17}{8}$ आहे ?

A) 24 B) 210 C) 27 D) 110

59) 18 पुरुष एक काम 40 दिवसात पुर्ण करतात. जर 2 पुरुष 3 स्त्रियांएवढे काम करत असतील तर 12 स्त्रिया तेच काम किती दिवसात करतील ?

A) 60 दिवस B) 90 दिवस C) 120 दिवस D) 100 दिवस

60) 'अ' हा 'ब' च्या तिप्पट वेगाने काम करतो. दोघे मिळून एक काम 21 दिवसांत पुर्ण करतात, तर एकटा 'अ' हा तेच काम किती दिवसांत पुर्ण करेल ?

A) 31 दिवस B) 25 दिवस C) 28 दिवस D) 24 दिवस

61) एक व्यक्ती त्याच्या नेहमीच्या वेगाच्या $\frac{5}{8}$ पट वेगाने चालल्यास तो 15 मिनिटे उशीरा पोहचतो. तर त्या व्यक्तीला त्याच्या नेहमीच्या वेगाने किती वेळ लागत असेल ?

A) 40 मिनिटे B) 20 मिनिटे C) 25 मिनिटे D) 30 मिनिटे

62) चार क्रमगत संख्यांची बेरीज 110 आहे, त्यापैकी सर्वात मोठी संख्या कोणती ?

A) 27 B) 30 C) 31 D) 29

63) चार मुलींचे सरासरी वय 21 वर्षे आहे, त्यांचे वयांचे गुणोत्तर 2:3:4:5 असल्यास त्यापैकी सर्वात लहान व सर्वात मोठ्या मुलींच्या वयांची बेरीज किती ?

A) 12 B) 42 C) 24 D) 36

64) एका दुकानदाराने एक साडी 1375 रुपयांना विकल्यास त्याला 275 रुपये नफा होतो, तर त्या दुकानदाराला शेकडा किती नफा होतो ?

A) 30% B) 25% C) 40% D) 15%

65) एका दुकानदाराने 50 पेन 150 रुपयांना विकले तेव्हा त्याला 50% नफा झाला, तर त्याला त्या व्यवहारात एकुण किती रुपये नफा झाला ?

A) 25 रुपये B) 75 रुपये C) 50 रुपये D) 100 रुपये

66) एका बँकेला 15,000 मुद्दलावर 7 वर्षात 12600 सरळव्याज मिळते, तर व्याजाचा द.सा.द.शे. दर किती ?

A) 10% B) 15% C) 20% D) 12%

67) सरळव्याजाने एका रकमेची दामदुप्पट होण्यास 9 वर्षे लागतात, तर त्याच रकमेची, त्याच दराने तिप्पट होण्यास किती वर्षे लागतील ?

A) 15 वर्षे B) 18 वर्षे C) 27 वर्षे D) 21 वर्षे

68) जर 1995 साली प्रजासत्ताक दिन हा सोमवारी आला असेल तर 2000 साली प्रजासत्ताक दिन हा कोणत्या वारी आला असेल ?

A) शुक्रवार B) शनिवार C) रविवार D) सोमवार

69) 11 वाजून 20 मिनिटांनी घड्याळाच्या तास काटा व मिनिट काटा यात किती अंशाचा कोन होईल ?

A) $220^0$ B) $140^0$ C) $110^0$ D) $95^0$

70) एका आयताचे क्षेत्रफळ 108 चौ.से.मी. असून आयताची लांबी 12 से.मी. आहे. तर आयताचा कर्ण किती असेल ?

A) 20 से.मी. B) 9 से.मी. C) 16 से.मी. D) 15 से.मी.

71) एका मोठया रथाच्या चाकाची त्रिज्या 2.1 मीटर आहे, तर 6.6 कि.मी. अंतर पार करण्यासाठी चाकाचे किती फेरे व्हावे लागतील ?

A) 300 फेरे B) 500 फेरे C) 400 फेरे D) 455 फेरे

72) एका वर्तुळाचा परिघ हा 50% ने वाढवला, तर त्या वर्तुळाचे क्षेत्रफळ किती टक्के ने वाढेल ?

A) 100% B) 120% C) 125% D) 150%

73) 1.1 मीटर लांबी असलेल्या तारेतून 11 से.मी. चा एक तुकडा कापुन घेतला, तर उरलेल्या तारेची लांबी किती ?

A) 0.11 मीटर B) 9.9 मीटर C) 9.9 से.मी. D) 99 से.मी.

74) 52 पत्यांच्या एका कॅटमधून एक पत्ता याद्दच्छिकपणे काढला असता तो पत्ता 'राजा' असण्याची संभाव्यता किती ?

A) $\frac{1}{52}$ B) $\frac{4}{13}$ C) $\frac{1}{13}$ D) $\frac{1}{4}$

75) एका वृत्तचिती आकाराच्या पाण्याच्या टाकीचे घनफळ 6160 घनमीटर असुन तिची त्रिज्या 14 मीटर आहे, तर त्या टाकीची उंची किती ?

A) 10 मीटर B) 7 मीटर C) 14 मीटर D) 20 मीटर

76) आंतरराष्ट्रीय मानक (प्रोटोटाइप) किलोग्रॅम हे वस्तुमान बनविताना 90% प्लॅटिनम या मिश्र धातुचा वापर केला आहे. तर उरलेले 10% वापर कोणत्या मौल्यवान धातुचा केला आहे ?

A) इरिडीयम B) थॅलियम C) रोडियम D) पॅलेडियम

77) लक्षव्दीप केंद्रशासित प्रदेशाचे एकमेव विमानतळ कोणत्या बेटावर स्थित आहे ?

A) हॅवलॉक बेट B) अगत्ती बेट C) सालसेट बेट D) सागर बेट

78) भारतात राष्ट्रीय महामार्गाची सर्वाधिक लांबी असलेले राज्य कोणते ?

A) महाराष्ट्र B) राजस्थान C) उत्तरप्रदेश D) मध्यप्रदेश

79) खालीलपैकी कोणते ज्योतिर्लिंग नाही ?

A) रामेश्वर B) श्रीशैलम C) त्र्यंबकेश्वर D) हरीव्दार

80) पुर्व खान्देश जिल्हा कोणत्या वर्षी स्थापन झाला ?

A) 1960 B) 1947 C) 1906 D) 1950



Scanned with OKEN Scanner

81) **खालीलपैकी कोणते कर्नाटक संगीतातील प्रसिध्द त्रिमुर्तींपैकी एकाचे नाव नाही ?**

A) त्यागराज B) बालमुरलीकृष्ण C) शामा शास्त्री D) मुथुस्वामी दीक्षितर

82) **भारतामध्ये उर्जेचा सर्वात मोठा स्त्रोत कोणता आहे ?**

A) कोळसा B) जलविद्युत C) नवीकरणीय उर्जा D) अणुऊर्जा

83) **खालीलपैकी कोणत्या पर्यायांमध्ये राज्यांची मांडणी पुर्वेकडून पश्चिमेकडे योग्य क्रमाने केली जाईल ?**

A) राजस्थान, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल, मेघालय B) मध्यप्रदेश, गुजरात, बिहार, मणिपुर

C) त्रिपुरा, पश्चिम बंगाल, गुजरात, बिहार D) नागालँड, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, महाराष्ट्र

84) **खालीलपैकी योग्य जोडया जुळवून योग्य पर्यायाची निवड करा ?**

| | |
|---|---|
| a) अमेरीका | i) तेजस |
| b) रशिया | ii) राफेल |
| c) फ्रान्स | iii) F -16 |
| d) भारत | iv) मिग 29 |

A) a - i, b - ii, c - iii, d - iv B) a - iii, b - iv, c - ii, d - i

C) a - ii, b - iv, c - iii, d - i D) a - i, b - iv, c - iii, d – i

85) **संगणकात कॅश (Cache) मेमरी ही ............ असते**

A) लहान बफर स्टोरेज B) कायमस्वरुपी स्टोरेज C) मुख्य मेमरी D) यापैकी नाही

86) **तलावाच्या वरचा पृष्ठभाग बर्फात गोठलेला असतांना तलावाच्या तळाशी असलेल्या पाण्याचे तापमान साधारण किती असते ?**

A) -10°C B) 0°C C) 4°C D) -4°C

87) **भारताचे केंद्रिय शिक्षणमंत्री कोण आहेत ?**

A) विरेंद्र कुमार B) जितन राम मांझी C) धमेंद्र प्रधान D) गिरिराज सिंह

88) **भारताने आयसीसी पुरुष टी-20 विश्वचषक किती वेळा जिंकला आहे ?**

A) 1 B) 2 C) 3 D) 4

89) **हडप्पा स्थळ - राज्य**

**1. लोथल - राजस्थान**
**2. कालीबंगन - उत्तरप्रदेश**
**3. ढोलावीरा - गुजरात**
**4. राखीगढी - हरियाणा**

**वर दिलेल्या जोडयांपैकी कोणत्या योग्य जुळल्या आहेत ?**

A) फक्त 3 आणि 4 B) फक्त 1 आणि 4 C) फक्त 1 आणि 3 D) फक्त 2 आणि 3



Scanned with OKEN Scanner

90) 2024 मध्ये लोकसभा निवडणुक किती टप्प्यामध्ये घेण्यात आल्या ?
A) 1 B) 3 C) 5 D) 7

91) भारतीय राज्यघटनेमध्ये जीविताचे व व्यक्तीस्वातंत्र्याचे संरक्षण कोणत्या कलमात दिले आहे ?
A) 14 B) 20 C) 21 D) 25

92) भारतात नवीन फौजदारी कायदे कोणत्या तारखेपासुन लागू झाले ?
A) 1 जुन 2023 B) 1 डिसेंबर 2023 C) 1 जानेवारी 2024 D) 1 जुलै 2024

93) Apiculture (ॲपीकल्चर) म्हणजे काय ?
A) मधमाशी पालन B) कृत्रिम मत्स्य संवर्धन C) द्राक्ष संवर्धन D) मुंग्यांचा अभ्यास

94)

| देश | राजधानी |
|---|---|
| a) फिनलॅन्ड | i) उलनबातर |
| b) अर्जेंटिना | ii) हेलसिंकी |
| c) सोमालिया | iii) मोगादिशू |
| d) मंगोलिया | iv) बिनोस आयर्स |

A) a - i, b - ii, c - iii, d - iv
B) a - iii, b - i, c - iv, d - iii
C) a - ii, b - iv, c - i, d - iii
D) a - ii, b - iv, c - iii, d - i

95) नागासाकीवर टाकण्यात आलेल्या अणुबॉम्बचे नाव काय होते ?
A) लिटल बॉय B) बिग मॅन C) फॅट मॅन D) फॅट बॉय

96) 71 वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारातील सर्वोत्कृष्ट चित्रपट कोणता ?
A) 12 वी फेल B) जवान C) द केरला स्टोरी D) मिसेस चॅटर्जी वर्सेस नॉर्वे

97) त्र्यंबकेश्वर येथे मागील कुंभमेळा कोणत्या वर्षी झाला होता ?
A) 2013 B) 2014 C) 2015 D) 2016

98) काझीरंगा हे राष्ट्रीय उद्यान कोणत्या राज्यात आहे ?
A) राजस्थान B) आसाम C) झारखंड D) कर्नाटक

99) उत्पादनानुसार जगातील सर्वात मोठी वाहन उत्पादक (ऑटोमोटीव मॅन्युफॅक्चरर) कंपनी कोणती आहे ?
A) जनरल मोटर्स B) हयुंदाई C) वोक्सवॅगन D) टोयोटा

100) छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंकलेला पहिला गड कोणता ?
A) राजगड B) तोरणा C) शिवनेरी D) कोंढाणा

Scanned with OKEN Scanner